शुक्रवार दि. ०३ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मराठवाड्यातील सर्वात मोठा करदाता ठरला कालिका स्टील अलॉयज

## वेळेवर कर भरणे, पारदर्शक व्यवहार आणि राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान; ९व्या GST वर्धापन दिनानिमित्त सन्मान

**छत्रपती संभाजीनगर -प्रतिनिधी**

देशाच्या आर्थिक विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या करव्यवस्थेला सक्षम बनविण्यात प्रामाणिक करदात्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारच्या वस्तू व सेवा कर () व्यवस्थेअंतर्गत नियमित व पारदर्शक कर भरणाऱ्या उद्योगांचा गौरव करण्याच्या उद्देशाने केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ९व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मराठवाड्यातील अग्रणी करदाता म्हणून मे. कालिका स्टील अलॉयज प्रा. लि. या कंपनीचा गौरव करण्यात आला.



आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कर अनुपालन, वेळेवर कर भरणे आणि शासनाच्या महसुलात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल कंपनीचे संचालक श्री. घनश्यामदासजी गोयल यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान विभागीय आयुक्त मा. श्री. प्रदीप गुरुमूर्थी, अतिरिक्त आयुक्त मा. श्री. राजकुमार केंद्रे तसेच सह आयुक्त मा. श्री. रोहित निगवेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित अधिकाऱ्यांनी कालिका स्टील अलॉयजच्या पारदर्शक आर्थिक व्यवहारांचे, कर नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या वृत्तीचे आणि वेळेवर भरण्याच्या शिस्तीचे विशेष कौतुक केले. उद्योग क्षेत्राने केवळ व्यवसाय वाढविण्यावर भर न देता शासनाच्या महसुलात प्रामाणिकपणे योगदान दिल्यास देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सन्मान स्वीकारल्यानंतर श्री. घनश्यामदासजी गोयल यांनी केंद्रीय विभागाच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. ‘‘कर भरणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून राष्ट्रनिर्मितीतील आपले कर्तव्य आहे. हा पुरस्कार कंपनीतील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगितले. भविष्यातही कर नियमांचे पूर्ण पालन करून शासनाच्या विकास प्रक्रियेत योगदान देण्याची आमची बांधिलकी कायम राहील,‘‘ असे त्यांनी नमूद केले. कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगतीचा पाया हा कर महसुलावर उभा असतो. नागरिक आणि उद्योगांकडून जमा होणाऱ्या करातून केंद्र व राज्य सरकारांना विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होतो. याच निधीतून राष्ट्रीय महामार्ग, पूल, रेल्वे, विमानतळ, पाणीपुरवठा योजना, वीज प्रकल्प, आरोग्य सुविधा, सरकारी रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, कृषी योजना, संरक्षण व्यवस्था, पोलिस यंत्रणा तसेच विविध सामाजिक कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. वेळेवर कर भरणारे उद्योग आणि व्यापारी शासनाच्या महसुलात सातत्याने भर घालत असल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळते. प्रामाणिक करदात्यांमुळे करचुकवेगिरीला आळा बसण्यास मदत होते, आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक होतात आणि उद्योग क्षेत्रावरील गुंतवणूकदारांचा विश्वासही वाढतो. १ जुलै २०१७ रोजी देशभरात लागू झालेल्या वस्तू व सेवा कर () व्यवस्थेमुळे अनेक अप्रत्यक्ष कर एकाच प्रणालीत समाविष्ट झाले. यामुळे करप्रणाली अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल बनली आहे. ई-इनव्हॉइस, ई-वे बिल, ऑनलाइन रिटर्न आणि डिजिटल करभरणा यामुळे कर संकलनात मोठी वाढ झाली असून करचुकवेगिरीवर नियंत्रण मिळविण्यास मदत झाली आहे. इतर उद्योगांसाठी प्रेरणादायी कामगिरी मराठवाड्यातील अग्रणी करदाता म्हणून कालिका स्टील अलॉयजला मिळालेला हा सन्मान केवळ कंपनीसाठीच नव्हे, तर संपूर्ण औद्योगिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी मानला जात आहे. उद्योगांनी प्रामाणिकपणे कर भरल्यास शासनाचा महसूल वाढून विकासकामांना गती मिळते आणि ‘‘विकसित भारत‘‘ घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# टेंभुर्णी- कुंभारझरी रस्त्याची दुरवस्था; गुत्तेदाराच्या हलगर्जीपणाने अपघाताचा धोका

## शासनाकडून निधी मंजूर, वर्क ऑर्डरला सहा महिने उलटले तरी काम रखडले; ग्रामस्थ संतप्त, उपोषणाचा इशारा

**जाफराबाद । दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी ते कुंभारझरी हा अत्यंत महत्त्वाचा आणि दळणवळणाच्या दृष्टीने जीवनवाहिनी मानला जाणारा रस्ता सध्या अक्षरशः खड्डेमय झाला असून, पावसाळ्यात या रस्त्यावरून प्रवास करणे जीव धोक्यात घालण्यासारखे बनले आहे. शासनाकडून रस्ता मजबुतीकरणासाठी लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाची वर्क ऑर्डरही काढली आहे. मात्र, सहा



महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. टेंभुर्णी ते कुंभारझरी हा सुमारे दहा किलोमीटरचा रस्ता जाफराबाद व भोकरदन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून दररोज शालेय विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नोकरदार, रुग्णवाहिका तसेच मालवाहू वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र रस्त्यावर जागोजागी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

कुंभारझरी ग्रामपंचायतीचे सदस्य सुनील नानाभाऊ *(पान २ वर)*

# रस्त्यांच्या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार : दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करा

## मा.आ.कैलास गोरंटयाल यांची प्रशासनाकडे मागणी

**जालना -प्रतिनीधी**



जालना पंचायत समिती कार्यालया अंतर्गत तालुक्यातील विविध गावांमध्ये मंजूर करण्यात आलेली रस्त्यांची कामे कागदोपत्री करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आल्याचा गंभीर आरोप जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, जालना पंचायत समिती कार्यालया अंतर्गत एप्रिल २०२३ ते मार्च २०२६ या कालावधीत पंचायत समिती स्तरावर शासनाच्या विविध योजना व उपकर या मधुन गावअंतर्गत रस्ते बांधकाम, जोडरस्ते बांधकाम, रस्त्याचे मजबुतीकरण करणे, रस्ते माती विकास, रस्ता खडीकरण इत्यादी कामे हाती घेतल्याचे दर्शवून सदर कामे न करताच परस्पर देयके उचलुन शासनाची *(पान २ वर)*

## प्रभाग क्रमांक १० मधील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर

# तुम्ही आम्हाला मतदान केलं का?

## नगरसेविकेच्या पतीची ऑडिओ क्लिप व्हायरल!

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्रमांक १० (पूर्वीचा प्रभाग क्रमांक १३) मधील विठ्ठल मंदिर रोड परिसरातील कचऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. या भागातील कचरा अड्डा तातडीने बंद करावा आणि परिसराची नियमित स्वच्छता करावी, या मागणीसाठी माजी नगरसेवक विजय पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक नागरिकांनी जालना महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाला लेखी निवेदन दिले आहे. मात्र, याच समस्येवरून लोकप्रतिनिधी आणि नागरिकांमधील एक कथित ऑडिओ संवाद सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असल्याने या प्रकरणाला आता राजकीय व सामाजिक वळण मिळाले आहे.

५ वर्षांपासून नागरिक त्रस्त; आंदोलनाचा इशारा

नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, विठ्ठल मंदिर रोड परिसरात गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने कचरा टाकला जात



आहे. या संदर्भात रहिवाशांनी १६ जुलै २०२१, ९ ऑगस्ट २०२१, २८ सप्टेंबर २०२१ आणि ७ जून २०२२ रोजीही महानगरपालिकेकडे वारंवार लेखी तक्रारी केल्या होत्या. परंतु, प्रशासनाकडून अद्यापही यावर कोणताही कायमस्वरूपी तोडगा काढण्यात आलेला नाही, असा थेट आरोप नागरिकांनी केला आहे. कचऱ्यामध्ये प्राण्यांचे अवशेष, कुजलेला कचरा आणि इतर घातक वस्तू टाकल्या जात असल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. याचा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, या परिसरात ४ शाळा असून दररोज शेकडो विद्यार्थ्यांना या असह्य दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून सफाई कर्मचारीही या भागात नियमित येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन हा कचरा अड्डा बंद न केल्यास, लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे.

हा कचऱ्याचा प्रश्न पेटलेला असतानाच, सोशल मीडियावर प्रभाग क्रमांक १० च्या नगरसेविका कार्तिकी मनोज इंगळे यांचे पती मनोज इंगळे आणि स्थानिक नागरिक मंगेश कराळे यांच्यातील दूरध्वनीवरील संभाषणाची एक कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे.

या संभाषणात, नागरिक वारंवार कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर किंवा मजूर पाठवण्याची आणि संबंधित कर्मचाऱ्यांशी बोलणे करून देण्याची मागणी करत असल्याचे ऐकू येते. यावर लोकप्रतिनिधीच्या वतीने, ‘‘तुम्ही आम्हाला मतदान केलं का? मतदानाच्या वेळी आम्हाला मदत केली का?‘‘ असा रोखठोक सवाल विचारण्यात आल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. तसेच, ‘‘सारखे सारखे फोन करू नका, आम्ही काम करतच आहोत,‘‘ असेही या संभाषणात समोर आले आहे.

या कथित संभाषणामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या व्हायरल ऑडिओ क्लिपबाबत अद्याप संबंधित लोकप्रतिनिधी किंवा त्यांच्या पतीची कोणतीही अधिकृत भूमिका समोर आलेली नाही.

निवेदनावर शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या महानगरपालिकेला देण्यात आलेल्या या निवेदनावर माजी नगरसेवक विजय पवार, मंगेश कराळे, रमेश गव्हाणे, विजय रत्नपारखी, शिवसेनेचे प्रभुदास शिंदे, सुनिता गोरे, गणेश देशमुख यांच्यासह प्रभाग क्रमांक १० मधील अनेक संतप्त नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता यावर महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधी काय पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

...तर पोलीस ठाण्यात नगरसेवक हरवल्याची तक्रार करणार: विजय पवार

या संपूर्ण प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत माजी *(पान २ वर)*

# जालना - छत्रपती संभाजीनगरातील मुलींसाठी शासकीय/अनुदानित बालगृहांचा मार्ग मोकळा

## राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

**जालना -प्रतिनिधी**



मराठवाड्यातील अनाथ, निराधार, पीडित आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलींसाठी दिलासादायक निर्णयाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे मुलींसाठी शासकीय / अनुदानित बालगृहे स्थापन करण्याचा सविस्तर प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याचे निर्देश महिला व बाल विकास आयुक्तांना दिले आहेत. पुणे येथे २५ जून रोजी झालेल्या आयोगाच्या सुनावणीत या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मुलींसाठी शासकीय किंवा अनुदानित बालगृहे नसल्याचा गंभीर मुद्दा समोर आला. त्यामुळे अनाथ, निराधार आणि संरक्षणाची व काळजीची गरज असलेल्या मुलींना इतर दूरच्या जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित करावे लागत असल्याने त्यांच्या शिक्षण, पुनर्वसन आणि मानसिक सुरक्षिततेवर विपरीत परिणाम होत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर आयोगाने आवश्यक तांत्रिक व आर्थिक तरतुदींसह प्रस्ताव तयार करून शासनाकडे तातडीने मंजुरीसाठी पाठविण्याचे आदेश महिला व बालकल्याण आयुक्तालयाला दिले आहेत. प्रस्ताव सादर झाल्यानंतर त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवालही आयोगाला सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गरजू मुलींना त्यांच्या जिल्ह्यातच सुरक्षित निवारा, शिक्षण, संगोपन आणि पुनर्वसनाची सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. *(पान २ वर)*

## संपादकीय....

### पात्रांना प्रथम पीआर कार्ड द्या; विश्वास वाढेल, महसूलही वाढेल

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांसाठी सुरू असलेली पीआर ( ) कार्ड प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. १४ झोपडपट्ट्यांपैकी ११ झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून हजारो कुटुंबांची माहिती संकलित केली जात आहे. प्राथमिक पडताळणीत शेकडो लाभार्थी पात्र ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, जे लाभार्थी सर्व निकष पूर्ण करून पात्र ठरले आहेत, त्यांना तात्काळ पीआर कार्ड देण्यास महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा का? याचे उत्तर निश्चितपणे होय असेच आहे. शासनाच्या कोणत्याही योजनेत पात्र लाभार्थ्यांना केवळ इतरांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही म्हणून प्रतीक्षा करायला लावणे योग्य ठरत नाही. ज्या झोपडपट्टीधारकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर केली, मालमत्ता कर भरला, सर्वेक्षण पूर्ण करून घेतले आणि पात्रतेचे निकष पूर्ण केले आहेत, त्यांना पीआर कार्ड देण्यास कोणतीही अडचण नसावी. उलट अशा लाभार्थ्यांना प्रथम लाभ दिल्यास संपूर्ण प्रक्रियेबाबत नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. आज अनेक झोपडपट्ट्यांमध्ये अशी मानसिकता दिसून येते की, ''कागदपत्रे जमा करूनही काहीच होत नाही.'' ही भावना बदलण्यासाठी प्रशासनाने कृतीतून विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. पहिल्या टप्प्यात पात्र लाभार्थ्यांना पीआर कार्ड वितरित झाल्यास उर्वरित झोपडपट्टीधारकांनाही आपली कागदपत्रे पूर्ण करण्याची प्रेरणा मिळेल. यामागे आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाचा मुद्दा दडलेला आहे. अनेक नागरिकांनी अद्याप महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरलेला नाही किंवा आवश्यक कागदपत्रे पूर्ण केलेली नाहीत. जर त्यांना प्रत्यक्ष पीआर कार्ड वितरण सुरू झाल्याचे दिसले, तर तेही कर भरणा करून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढे येतील. यामुळे महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होऊ शकते. म्हणजेच, पीआर कार्डचे टप्प्याटप्प्याने वितरण हे केवळ नागरिकांच्या हिताचेच नव्हे, तर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचेही ठरू शकते.

याशिवाय, पीआर कार्ड म्हणजे केवळ मालकी हक्काचे प्रमाणपत्र नाही. ते बँक कर्ज, विविध शासकीय योजना, मूलभूत नागरी सुविधा आणि भविष्यातील विकासकामांसाठी महत्त्वाचा दस्तऐवज ठरू शकते. त्यामुळे पात्र नागरिकांना त्याचा लाभ वेळेत मिळणे आवश्यक आहे.

अर्थात, या प्रक्रियेत पारदर्शकता आणि कायदेशीर निकषांचे काटेकोर पालन तितकेच महत्त्वाचे आहे. पात्रता निश्चित झाल्यानंतरच कार्डांचे वितरण व्हावे आणि कोणत्याही प्रकारची घाईगडबड किंवा पक्षपात टाळला जावा. उर्वरित झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण आणि कागदपत्र पडताळणीही त्याच वेगाने सुरू ठेवणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात बैठक घेऊन प्रक्रिया गतीमान करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आता त्या सूचनांचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर आहे. ज्या नागरिकांनी शासनाने घालून दिलेल्या सर्व अटी पूर्ण केल्या आहेत, त्यांना आणखी प्रतीक्षा करायला लावणे न्याय्य ठरणार नाही. पात्र लाभार्थ्यांना तातडीने पीआर कार्ड देऊन उर्वरित नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे, कर संकलनाला चालना देणे आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक परिणामकारक करणे, हाच सध्या सर्वात व्यवहार्य आणि लोकहिताचा मार्ग ठरेल.

युवा आदर्श महाराष्ट्र दि. ०३-०७-२०२६

CHANGE IN NAME

I declare by this publication that there is a change in my name.

OLD NAME

**BHARAT BHAGWANRAO BHUTEKAR**

NEW NAME

**BHARAT BHAGWAN BHUTEKAR**

As per my documents, my friends and relatives know me by my new name

Address : B-4, Avadhoot Apartment, Priyanka Residency Mantha Road, Jalna (MH) – 431203

Mo. +919881244524

## आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेसाठी पात्र १० खेळाडूंचा सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

: जालन्यात नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेत जिल्ह्यातील ४० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यापैकी १० खेळाडूंनी मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेसाठी पात्रता मिळवत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला.

या यशाबद्दल भाजपा नगरसेवक आनंद शिवाआप्पा झारकंडे व अकाय प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंसह त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खेळाडूंच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नगरसेवक आनंद शिवाआप्पा झारकंडे यांनी आपल्या मनोगतात, जिल्हातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करून आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला आहे, ही अभिमानाची बाब आहे. भविष्यातही खेळ आणि खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी मी कायम त्यांच्या पाठीशी उभा राहीन, असे सांगितले. यावेळी जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष व मराठवाडा विभाग प्रमुख भूषण यादव यांनी सिलंबम या प्राचीन भारतीय युद्धकलेचे महत्त्व, त्याचा वाढता आंतरराष्ट्रीय विस्तार आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना उपलब्ध होत असलेल्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. सातत्यपूर्ण सराव, पालकांचे सहकार्य आणि प्रशिक्षकांच्या मेहनतीमुळे जिल्ह्यातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी प्रा डॉ नितिन भक्त निकिता खरडेकर प्रसाद मुंडलिक ओमकार भूतेकर शिवांश झारखंडे खेळाडू, पालक, क्रीडाप्रेमी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गळती थांबेचि ना...

महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतरांची मालिका अजूनही थांबलेली नाही. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतून सुरू असलेली गळती हा पक्षासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. प्रत्येक पक्षांतरानंतर नेतृत्वाला धक्का बसल्याचे चित्र दिसते, तर दुसरीकडे संघटनेतील संवाद, नेतृत्वाची पकड आणि कार्यकर्त्यांशी असलेले संबंध यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अलीकडेच माजी मंत्री आणि आमदार सचिन अहिर यांनीही उद्धव ठाकरे गटाची साथ सोडत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्याआधी खासदार संजय दिना पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनीही पक्षाला रामराम ठोकला होता. पक्षातील नाराजी, नेतृत्वावरील विश्वास, राजकीय वास्तव आणि बदलत्या सत्तासमीकरणांच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या घडामोडी महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण देत आहेत.

सहा खासदारांच्या बंडखोर गटात संजय दिना पाटील यांचे नाव आले आणि त्यांनी अधिकृतरीत्या शिंदे सेनेत प्रवेश केला, तेव्हाच आमदार सचिन अहिरही उबाठातून बाहेर पडणार, हे जाणकारांनी हेरले होते. अहिर ज्या पक्षात होते, त्या पक्षाच्या प्रमुखांना आणि त्यांच्या युवराजांना मात्र याने चांगलाच धक्का बसलेला दिसला. त्यांना याची जराही कल्पना नव्हती, हे त्यांनी उघडरीत्या व्यक्त केलेल्या भावनांतून तरी दिसते. आपल्याबरोबर असणाऱ्यांची किती माहिती ही मंडळी किती ठेवतात आणि राजकारणाची त्यांना किती जाण आहे, हेही यावरून स्पष्ट होते. यशस्वी राजकारण करायचे, आपल्या बरोबरच्या नेत्या, कार्यकर्त्यांचे भविष्य घडवायचे, तर त्यासाठी कान जमिनीला लागलेले असावे लागतात. प्रत्यही प्रवाही राजकारणातल्या वाऱ्यांचा वेध घ्यावा लागतो. उबाठा आणि त्यांच्या चिरंजीवांकडून ही अपेक्षा करता येत नाही. कारण त्यांना मुळात राजकारणात, जनजीवनातच रस नाही. आपल्याबरोबरच्या लोकांबाबत आस्था नाही. राजकारणामुळे साध्य होऊ शकणाऱ्या अन्य बाबींत मात्र त्यांना विलक्षण रस आहे! त्यामुळे, त्यांचे विषयही तेच असतात. विचार करण्याचे, चिंतनाचे विषय जर सतत केवळ चैन आणि ऐषोरामाचे असतील, तर अशा नेत्यांच्या वाट्याला यापेक्षा वेगळे काय येणार? उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत मोठी फूट पडली, तेव्हा जनमानसात या पिता-पुत्राबाबत थोडीशी सहानुभूती होती. त्यांनी चेहऱ्यावर भोळेपणाचा आणि सज्जनतेचा जो बुरखा घेतला होता, त्यामुळे मध्यमवर्गीय मतदारात सहानुभूती तयार झाली होती. पण, त्यानंतरच्या निवडणुकांत त्यांनी उपसलेले कष्ट, पक्ष वाचवण्यासाठी घेतलेली ढोर मेहनत, प्रबोधनकार आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुखांचा वारसा सिद्ध करण्यासाठी दाखवलेली कमालीची सजगता पाहून मतदारांचे डोळे दिपून गेले. या पिता-पुत्राच्या ऐदी, आळशी आणि आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याच्या वृत्तीकडे पाहून त्यानंतरच्या फुटींवेळी, पराभवांवेळी त्यांच्या बाजूने जनतेची सहानुभूती अजिबात दिसत नाही. शिवसैनिकांकडून संताप व्यक्त व्हायला, संताप उमटायला आता तिथे शिवसैनिकच शिल्लक नाही आणि जो जुन्या निष्ठेने शिल्लक आहे, त्याला वस्तुस्थिती दिसते आहे.

तो तरी आपल्या मनाची किती फसवणूक करून घेईल? त्यामुळे, उबाठाच्या अ. भा. प्रवक्त्यांनी ऑपरेशन तुडवाचा आदेश देऊनही रस्त्यावरची एक काडीही कोणी पायाखाली घेतली नाही! शिल्लक आमदारांपैकी, नगरसेवकांतल्या एकानेही हा आदेश पाळू नये? प्रवक्त्यांनी खरेतर यावरून आपली संघटनेतील पत लक्षात घ्यायला हवी होती. पण, ते तसे (कधीच) करणार नाहीत. कारण, ते ज्या दिवशी पक्षातली पत पाहून बोलायला जातील, त्यावेळी त्यांच्याकडे बोलण्यासारखे काहीच नसेल. उबाठातल्या शिल्लक असल्यानसल्या पदाधिकाऱ्यांना आणि या प्रवक्त्यांना हे पक्के माहीत आहे, की हे प्रवक्ते वृत्तवाहिन्यांसमोर जे बोलतात, त्याचा वस्तुस्थिती किंवा पक्ष संघटना किंवा पक्षाच्या राजकारणाशी काहीही संबंध नसतो. ती फक्त वृत्तवाहिन्यांची गरज असते. या प्रवक्त्यांच्या सख्ख्या भावाच्या मतदारसंघातही कोणा 'गद्दारा'ला तुडवल्याचे कोणी पाहिले का? सगळा बोलाचा भात अन्□ बोलाचीच कढी! खासदार अरविंद सावंत आज निष्ठेच्या अन्□ लोकसभेतल्या कामगिरीच्या मोठ्या गोष्टी करतात. त्यांना सहा - सात खासदारांचा छोटासा गटही सांभाळता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे. एवढ्या छोट्या गटातही काय चालले आहे, याचा अंदाज त्यांना आला नाही. आधी टेलिफोन कर्मचाऱ्यांची संघटना, त्यानंतर विधान परिषद, त्यानंतर लोकसभेत प्रदीर्घ संधी मिळूनही त्यांना एवढाही अंदाज येत नसेल, तर दोष त्यांच्या शून्य राजकीय कौशल्याला द्यायचा, की सतत संधी मिळत राहिल्याने अंगात मुरलेल्या बेफिकिरीला? बंगल्यावर जाऊन 'दरबारी कानखुजली' करत राहण्यापेक्षा संघटनेत जबाबदारी पार पडली असती, आपल्या पदांना न्याय दिला असता, तर पक्षाची गळती रोखण्यासाठी कोणीतरी काहीतरी करत आहे, हे दिसले असते. जाणाऱ्याने दोन मिनिटे थांबून विचार तरी केला असता! काही तासापूर्वीपर्यंत आपल्याबरोबर बसणारे, चर्चा करणारे अचानक उठून कसे काय निघून जातात? हा प्रश्न जे शिल्लक आहेत (आणि ज्यांच्या मनात बाजू बदलण्याचा तीळमात्रही विचार नाही) त्यांनी करायचा आहे. अन्यथा, जी अखेरची निष्ठावान म्हणून चार-दोन डोकी दिसताहेत, त्यातल्या अर्ध्यांबाबत बाहेर चर्चा सुरू आहेच. वयाच्या साठीच्या आसपास असलेले, या टप्प्यावर कशाला राजकीय आत्महत्या करतील? अहिर यांना पक्ष संघटनेत खूप काही जबाबदाऱ्या दिल्या गेल्या, कारण प्रश्न वरळी विधानसभा मतदारसंघाचा होता.

तो नसता, तर अहिर हे इतके पात्र वाटण्याचे काहीच कारण नव्हते! अहिर आणि संजय पाटील या दोघांनाही त्यांच्या मूळ पक्षात; राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही कमी संधी मिळाली नव्हती. दोघांनीही तिथे दीर्घकाळ मुंबईचे अध्यक्षपद सांभाळले होते. अहिर यांना राष्ट्रीय मिल मजदूर संघाची, तर कायमची भेट मिळाली. तिथेही ते पक्षनेतृत्वाच्या अगदी जवळ होते. उबाठातही अहिर यांना तसेच 'मानाचे पान' मिळाले. तरीही दोन्ही ठिकाणाहून ते इतक्या बेमालूम बाहेर पडले, की अखेरच्या क्षणापर्यंत त्यांच्या निकटवर्तियांनाही त्याचा संशय आला नाही! विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची माळ आता त्यांच्या गळ्यात आहे. आजपर्यंतच्या प्रवासापेक्षा ही जबाबदारी वेगळी आहे. या टप्प्यावरून त्यांचा राजकीय आलेख कुठल्या दिशेने जाणार, ते ठरणार आहे.

# भांडणे नकोत, विकासकामे हवीत



लोकशाही व्यवस्थेत मतभेद अपरिहार्य असले तरी ते सभागृहाच्या चौकटीत आणि सभ्य भाषेत मांडले जाणे अपेक्षित असते. कारण नागरिक लोकप्रतिनिधींना वैयक्तिक वाद, आरोप-प्रत्यारोप किंवा संघर्षासाठी नव्हे, तर त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करून शहराचा विकास घडवून आणण्यासाठी निवडून देतात. मात्र अलीकडच्या काळात नाशिक महापालिकेतील बैठका विकासाच्या मुद्द्यांपेक्षा शाब्दिक चकमकी, गोंधळ आणि राजकीय कुरघोड्यांमुळे अधिक चर्चेत येऊ लागल्या आहेत. सिडको प्रभाग समितीच्या बैठकीत दोन नगरसेवकांमध्ये झालेल्या वादानेही याच चिंतेला अधोरेखित केले आहे. शहरासमोर रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांसारखी अनेक प्रलंबित आव्हाने असताना लोकप्रतिनिधींनी परस्परांशी संघर्ष करण्याऐवजी विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येऊन काम करावे, अशीच नाशिककरांची अपेक्षा आहे. विकासाची गती वाढविणे, हेच आजच्या राजकारणाचे खरे प्राधान्य ठरायला हवे.

नाशिक महापालिकेतील सिडको प्रभाग समितीच्या बैठकीत भाजचे नगरसेवक सुधाकर बडगुजर आणि अपक्ष नगरसेवक मुकेश शहाणे यांच्यात झालेल्या शाब्दिक चकमकीने राजकीय वातावरण चांगलेच तापले. वाद इतका वाढला की, दोन्ही बाजूंनी शिवीगाळ झाल्याची चर्चा शहरभर रंगली. या घटनेनंतर नाशिककरांनी तीव्र नाराजी व्यक्त करत लोकप्रतिनिधींनी परस्परांशी संघर्ष करण्याऐवजी शहराच्या विकासावर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नाशिककरांनी महापालिका निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत देत तब्बल ७२ जागांवर विजय मिळवून दिला होता. त्यानंतर शिवसेनेलाही लक्षणीय यश मिळाले. शहराच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व मिळावे, या अपेक्षेने नागरिकांनी मत दिले होते. मात्र सत्ताधारी आणि इतर लोकप्रतिनिधींमध्ये वारंवार होणारे वाद, आरोप-प्रत्यारोप आणि संघर्षाचे प्रकार पाहता नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सिडको भागातून निवडून आलेले सुधाकर बडगुजर आणि मुकेश शहाणे यांच्यातील राजकीय मतभेद नवीन नाहीत. पूर्वीपासूनच दोघांमध्ये राजकीय संघर्ष सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्याचे पडसाद यापूर्वीही महापालिकेच्या सभागृहात उमटले होते. मात्र प्रभाग समितीच्या बैठकीत हा वाद पुन्हा उफाळून आल्याने लोकप्रतिनिधींच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महापालिकेच्या पहिल्याच महासभेत काही सदस्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सभागृहाचे वातावरण तापले होते. त्यावेळी महापौर हिमगौरी आडके यांनीही कठोर भूमिका घेत सभागृहाची शिस्त अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला होता. भविष्यात अशा प्रकारची गैरवर्तणूक किंवा सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर सहा महिन्यांपर्यंत निलंबनासारखी कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

त्यामुळे भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी झालेल्या विधान परिषद निवडणुकीतही महायुतीतील मतविभाजन चर्चेचा विषय ठरले होते. त्याचा फायदा घेत अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केला. या निकालानंतर महायुतीतील अंतर्गत मतभेद अधिक स्पष्ट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. नाशिककरांच्या अपेक्षा मात्र वेगळ्या आहेत. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, वाहतूक कोंडी, आरोग्य सुविधा, उद्याने, सार्वजनिक स्वच्छता आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नागरिकांनी लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. मात्र विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी राजकीय संघर्ष आणि वैयक्तिक वाद समोर येत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. महापालिकेचा आगामी वर्षाचा कार्यकाळ शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक विकासकामे मंजुरीच्या किंवा प्रारंभाच्या टप्प्यावर असून काही कामांना विलंबही झाला आहे. उशीर झाला असला तरी आता ही विकासकामे दर्जेदार, पारदर्शक आणि निश्चित वेळेत पूर्ण करणे हे महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधींसमोरील मोठे आव्हान आहे. यासाठी नगरसेवकांनी एकमेकांशी वाद घालण्याऐवजी प्रशासनावर सकारात्मक दबाव निर्माण करून विकासकामे गतीने पूर्ण करून घेणे अधिक गरजेचे आहे. शहराच्या हिताला प्राधान्य देत सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे काम केल्यासच नाशिकच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकते. नाशिककरांनी लोकप्रतिनिधींना भांडणे, आरोप-प्रत्यारोप किंवा सभागृहातील गोंधळ घालण्यासाठी निवडून दिलेले नाही. नागरिकांना अपेक्षा आहे ती विकासकामांची, दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याची आणि शहराचा सर्वांगीण विकास करण्याची. त्यामुळे राजकीय मतभेद बाजूला ठेवून लोकप्रतिनिधींनी विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येणे, हीच काळाची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### टेंभुर्णी- कुंभारझरी...

चव्हाण यांनी गुत्तेदारावर जाणीवपूर्वक हलगर्जीपणा व वेळकाढूपणा केल्याचा गंभीर आरोप केला आहे. शासनाने निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही गुत्तेदाराकडून ''डांबर उपलब्ध नाही'' असे कारण पुढे करून काम सुरू केले जात नसल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित गुत्तेदाराला राजकीय वरदहस्त असल्यामुळे प्रशासनाकडून त्याच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे काम सुरू करण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचा प्रकार सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज प्रवास करणारे वाहनचालक गजानन शेळके यांनी सांगितले की, पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने रस्त्याची अवस्था ओळखणे अशक्य होते. दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. सततच्या धक्क्यांमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत असून अनेकांना कंबरदुखी व मणक्याच्या समस्या निर्माण होत आहेत. अनेक वेळा किरकोळ अपघातही घडले असून मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी आमदार संतोष दानवे यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून संबंधित गुत्तेदाराला काम त्वरित सुरू करण्याच्या सूचना द्याव्यात, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागानेही विलंब करणाऱ्या गुत्तेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, रस्ता दुरुस्तीचे काम तातडीने सुरू न झाल्यास पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होणार असून शालेय विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### रस्त्यांच्या कामात...

व जालना तालुक्यातील जवळपास ३५ ते ४० गावातील ग्रामस्थांनी दिशाभूल व फसवणुक केल्याचा या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधीत गुत्तेदार आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांनी संगनमत करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून भ्रष्टाचाराशी संबंधित असलेल्या गुत्तेदारांचे परवाने रद्द करून या कटात सहभागी असणाऱ्या भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ .

निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### तुम्ही आम्हाला...

नगरसेवक विजय पवार यांनी एक अनोखा इशारा दिला आहे. प्रभाग क्रमांक १० मधील चारही नगरसेवक गेल्या निवडणुकीच्या निकालापासून प्रभागात फिरकलेलेच नाहीत, असा आरोप त्यांनी केला. प्रभागात नागरिकांच्या समस्या डोंगरएवढ्या वाढल्या असताना लोकप्रतिनिधींनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक १० चे चारही नगरसेवक बेपत्ता झाल्याची अधिकृत तक्रार कदिम जालना पोलीस ठाण्यात करणार असल्याची माहिती विजय पवार यांनी दिली आहे.

### जालना - छत्रपती संभाजीनगरातील...

**डॉ. संजय लाखेपाटील यांच्या पाठपुराव्याला यश**

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी जालना आणि छत्रपती संभाजीनगर येथे मुलींसाठी शासकीय किंवा अनुदानित बालगृहे उभारण्याचा मुद्दा आयोगाच्या बैठकीत ठामपणे मांडला होता. त्यांच्या आग्रहाची दखल घेत आयोगाने महिला व बाल विकास आयुक्तांना तातडीने प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिले. या प्रस्तावाला मंजुरी मिळून बालगृहांची प्रत्यक्ष उभारणी होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही डॉ. लाखेपाटील यांनी दिली. मराठवाड्यातील अनाथ , निराधार ,पिडीत आणि संरक्षण व काळजीची गरज असलेल्या मुलींसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून त्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी हा एक मोठा टप्पा मानला जात आहे.

### अहिल्यानगर...

संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष श्रीमती सुहासिनी प्रभुगावकर,श्री.गुरुदास सावल, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य ,श्री.सुभाष नाईक,राष्ट्रीय परिषद सदस्य असे आहेत.

या फेडरेशनचे केरळ, श्री.के.पी.विजयकुमार, राष्ट्रीय खजिनदार , महाराष्ट्र डॉ.जयपाल पाटील, राष्ट्रीय सचिव मो. ९२७०४४६७७७, तामिळनाडू श्री.आर. रंग राज, , ओडिसा, श्री.कान्हू नंदा , तेलंगणा श्री.आनंदम पुलिपलुपुला,राष्ट्रीय उपाध्यक्ष , आंध्र प्रदेश डॉ.जनार्दन ,मध्य प्रदेश, श्री.चंदर प्रकाश भारद्वाज , कर्नाटक श्रीमती शांताकुमारी, राष्ट्रीय सचिव ,नवी दिल्ली श्री.संदीप दीक्षित राष्ट्रीय अध्यक्ष ,केरळ श्री.एन.पी.चेक्कुटी राष्ट्रीय सरचिटणीस हे राष्ट्रीय पदाधिकारी असून गोवा येथील बैठकीत संघटनेच्या विविध मागण्यांसोबत भारत सरकार व राज्य सरकारचे मंत्री जेव्हा परदेशात अभ्यास दौऱ्यावर जातील त्यावेळी सोबत त्यांच्या जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकारांना सोबत न्यावे अशी मागणी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्याकडे करावी असे गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय कार्यकारणीत प्राध्यापक डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले. यासाठी महाराष्ट्र प्रभारी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्रीमती सुहासिनी प्रभू गावकर यांच्या मान्यतेने फेडरेशनचे जालना येथील ज्येष्ठ पत्रकार, महाराष्ट्र अध्यक्ष श्री. ओम प्रकाश शिंदे मोबा.८६६८९३५२८८ आणि पुणे येथील ज्येष्ठ पत्रकार सरचिटणीस श्री. संजय जोशी मोबा.९३०७८९५३७९ यांनी महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकारांना आवाहन केले आहे.

### युनायटेड ग्लोबल...

आणि समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा झाली. यावेळी युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाचे दुर्गेश बनकर, वैभव लाखोले, उमेश गिराम आणि ज्ञानेश्वर शास्त्री उपस्थित होते.

# शिर्डी येथे दिलीप वाघ यांचा साई प्रेरणा गौरव पुरस्कार २०२६ ने सन्मान




**दत्ता देशमुख**

सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे भोकरदन तालुक्यातील वरुड येथील समाजसेवक दिलीप शेषराव वाघ यांना ओम साई विकास प्रतिष्ठान व बी. बी.सी. फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणारा साई प्रेरणा गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

शिर्डी येथे आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध मराठी अभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते दिलीप वाघ यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

दिलीप वाघ यांनी सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या सातत्यपूर्ण व समाजहिताच्या कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या सन्मानामुळे भोकरदन जाफ्राबाद मध्ये परिसरात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# एकाच कुटुंबातील दहा जण पवित्र उमराह यात्रेसाठी रवाना




**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी येथील शेख शेख युसुफ यांच्या एकाच कुटुंबातील तब्बल १० जण पवित्र उमराह यात्रेसाठी गेले आहेत. यात्रेसाठी गेलेल्यांमध्ये शेख युसुफ व शेख मुनाफ या दोघा भावांसह त्यांचे पुतणे शिक्षक शेख साबेर, शेख मुश्ताक, शेख आरेफ तथा महिला व बालकांसह दहा जणांचा समावेश आहे. मुस्लिम धर्मांसाठी अतिशय पवित्र मानल्या जाणाऱ्या या उमराह यात्रेसाठी सौदी अरेबियातील मक्का व मदिना या पवित्र स्थळी जावे लागते. टेंभुर्णीतून एकाच कुटुंबातील व एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने उमराह यात्रेसाठी जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. हे सर्वजण गुरुवारी टेंभुर्णी येथून मुंबईकडे रवाना झाले. यावेळी त्यांना अनेकांनी भेटून या यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. यात्रेला निघण्यापूर्वी स्थानिक मानव सेवा मंडळातर्फे शिक्षक शेख साबेर, शेख मुश्ताक व शेख आरेफ यांचा सत्कार करून त्यांना या पवित्र यात्रेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. आपण पवित्र स्थळी संपूर्ण विश्वात सुख, शांती नांदो म्हणून विशेष दुआ करणार असल्याच्या भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केल्या. यावेळी मानव सेवा मंडळाचे प्रांत सचिव नसीम शेख, संजय राऊत, रावसाहेब अंभोरे, अलकेश सोमानी, अब्दुल नबी, बालाजी शेवाळे, शेख सादिक, अंकुश आढावे, संतोष आढावे, जावेद सिद्दिकी , शेख बबलू, मदर सिद्दिकी, शेख सलमान, अनिकेत अंभोरे आदींची उपस्थिती होती.

# प्रगतशिल शेतकरी कृष्णा कान्हेरे यांचा गुणवत्ता आणि व्यवस्थापनाचा उत्कृष्ट संगम

## थेट बाजारपेठेशी जोड निर्माण करुन शेतमालाला अधिक मुल्य मिळवून दिले

**बदनापूर - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार येथील प्रगतीशील व नवनवीन उपक्रम राबवणारे कृष्णा कान्हेरे यांनी जैविक शेती,शेतकरी मार्गदर्शन आणि सामाजिक कार्य यांचा अभ्यास करून राज्यस्तरीय व सोबतच गुणवत्ता वाढीवर भर दिला. फळांची ग्रेडिंग,पॅकिंग आणि थेट बाजारपेठेशी जोड निर्माण करून त्यांनी शेतमालाला अधिक मूल्य मिळवून दिले. आज त्यांच्या सीताफळ बागेतील उत्पादन व्यापाऱ्यांच्या पसंतीस उतरते. गुणवत्ता आणि व्यवस्थापन यांचा उत्कृष्ट संगम त्यांनी साधला आहे. कृष्णा कान्हेरे यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी मिळविलेले ज्ञान स्वतःपुरते मर्यादित ठेवले नाही. कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, आत्मा प्रकल्प, कृषी महाविद्यालये आणि विविध शासकीय संस्थांच्या माध्यमातून आयोजित कार्यक्रमांमध्ये ते सातत्याने सहभागी होत असतात.



शेतकरी मेळावे, प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन सत्रे, प्रात्यक्षिके यांद्वारे त्यांनी हजारो शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक शेतीचे ज्ञान पोहोचविले आहे. कीड नियंत्रण, जैविक शेती, जलव्यवस्थापन, पीक नियोजन आणि पूरक व्यवसाय याबाबत त्यांनी अनेकांना मार्गदर्शन केले आहे. कृष्णा कान्हेरे हे केवळ शेतकरी नसून सामाजिक कार्यकर्तेही आहेत. वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, युवकांना मार्गदर्शन, ग्रामीण विकास आणि शेतकरी संघटनांमध्ये सक्रिय सहभाग यामुळे त्यांचे कार्य अधिक व्यापक झाले

आहे. त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेत ग्रामीण भागात जनजागृती निर्माण केली आहे. शेती आणि समाज यांचे नाते अधिक मजबूत

करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. पुरस्कारांनी गौरवलेले कार्य कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना विविध संस्थांनी

पुरस्कार व सन्मान देऊन गौरविले आहे. प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांची राज्यभर ओळख निर्माण झाली आहे. मात्र पुरस्कारांपेक्षा शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच आपले खरे यश असल्याचे ते नम्रपणे सांगतात.

आजच्या काळात कृषी क्षेत्राला नव्या विचारांची गरज आहे. शेती ही तोट्याची नाही तर योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, पूरक व्यवसाय आणि सातत्यपूर्ण

प्रयत्न यांच्या जोरावर फायदेशीर ठरू शकते, हे कृष्णा कान्हेरे यांनी

आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे.

मराठवाड्याच्या मातीतून उगवलेला हा युवा शेतकरी आज हजारो शेतकऱ्यांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरला आहे.

त्यांच्या कार्यातून ग्रामीण भारताच्या नव्या विकासाची दिशा दिसते.

येणाऱ्या काळात त्यांच्या या कृषी चळवळीचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना

मिळेल आणि शाश्वत शेतीचा संदेश राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल, अशी

अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार १०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर

**मुंबई - प्रतिनिधी**

गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.

सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली. नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली. या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली.

आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत शेतकऱ्यांनी सहभागी होण्याकरीता १४ जुलैपर्यंत मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना सन २०२६-२७ या वर्षाकरीता जालना जिल्ह्यात अधिसुचित फळपिकांकरिता ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे.

या योजनेत मृग बहार सन २०२६-२७ मधील मोसंबी, द्राक्ष, डाळिंब, सीताफळ, संत्रा, लिंबू, पेरू, चिकू आणि हळद या पिकांचा समावेश आहे. या योजनेंतर्गत कमी पाऊस, पावसाचा खंड, जास्त तापमान, सापेक्ष आद्रता या हवामान धोक्यापासून संरक्षण मिळणार आहे. मोसंबी, द्राक्ष, डाळिंब, संत्रा, लिंबू, पेरू, चिकू आणि हळद पिकाकरीता भाग घेण्याची अंतिम मुदत १४ जुन, २०२६ अशी होती. परंतु मृग बहार सन २०२६-२७ मध्ये मोसंबी, द्राक्ष, डाळिंब, संत्रा, लिंबू, पेरू, चिकू आणि हळद या पिकाकरीता पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याकरीता दि. १४ जुलै, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच पुढीप्रमाणे फळपिकारीता अर्ज करण्याची अंतिम मुदत १४ जुलै, २०२६ आहे. मोसंबी उत्पादन वय ३ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित १ लाख रुपये, द्राक्ष उत्पादन वय २ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित ३ लाख ८० हजार रुपये, डाळिंब उत्पादन वय २ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित १ लाख ६० हजार रुपये, संत्रा उत्पादन वय ३ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित १ लाख रुपये, लिंबू उत्पादन वय ४ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित ८० हजार रुपये, पेरु उत्पादन वय ३ वर्ष विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित ७० हजार रुपये, चिकू उत्पादन वय ५ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित ७० हजार रुपये, हळद विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित १ लाख ६० हजार रुपये अशी आहे. तर सीताफळ या फळासाठी दि. ३१ जुलै २०२६ अंतिम मुदत असून उत्पादन वय ३ वर्षे, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर नियमित ७० हजार रुपये अशी आहे.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना विमा योजनेत भाग घेण्यासाठी फळपिक विमा ऑनलाईन पोर्टल ... वर सहभाग नोंदवावा. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# टेंभुर्णी तासभर पाऊस : आठवडी बाजारात व्यापारी हैराण: पेरण्या लांबणीवर

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी, येथील आठवडी बाजारामध्ये दुपारी आलेल्या पावसाने व्यापारी हैराण झाले अचानक जोराचा पाऊस सुरू झाल्याने बाजारातील गल्लीतून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहू लागले. बाजारातील सर्वच गल्ल्यातून पाणी वाहत असल्याने भाजीपाला व इतर साहित्य विक्रेत्यांची धांदल उडाली. पावसापासून बाजारातील साहित्य भिजू नये म्हणून अनेक व्यापाऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे ताडपत्री कापड मालांवर टाकले दरम्यान पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे. नुकतीच लागवड झालेल्या पिकाला या पावसाने जीवदान मिळाले आहे. परिसरात अजूनही पेरण्या बाकी असल्याने शेतकऱ्यांची बाजारात खरेदीसाठी लगबग दिसली. दरम्यान मंगळवारी ही परिसरात पाऊस झाल्याने पेरणीची कामे खोळंबली आहेत. मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी कपाशी पिकाची ठिकठिकाणी लागवड केली आहे परंतु सोयाबीन व इतर कडधान्य पिकांसह मकाची लागवड लांबणीवर पडली आहे मंगळवारी दुपारीही परिसरात जोरदार पाऊस झाल्याने शेतात पेरणीसाठी वाफसा झाली नाही परिणामी पेरणी लांबणीवर पडत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# जालना जिल्ह्यातील विद्यार्थिनीच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य संरक्षणासाठी सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अंबड येथे राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (वैद्यकीय) संदर्भातील मानसिक तणावाच्या पार्श्वभूमीवर एका विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना वृत्तांमधून समोर आल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक ताण, स्पर्धा परीक्षांचा दबाव आणि मानसिक आरोग्याच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी मा. जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे संविधानिक पद्धतीने सविस्तर निवेदन सादर केले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या वाढत्या घटना ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब असून अशा घटना केवळ एका कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे अपूरणीय नुकसान करणाऱ्या आहेत. वाढती स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, आर्थिक अडचणी, प्रशिक्षण संस्थांचा दबाव, परीक्षेतील अनिश्चितता, प्रश्नपत्रिका फुटीच्या घटना, निकालाबाबतची भीती व मानसिक आधाराचा अभाव यामुळे अनेक विद्यार्थी नैराश्याच्या गर्तेत जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी शासनाकडे प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थी मानसिक आरोग्य सहाय्यता केंद्र सुरू करणे, सर्व शाळा, महाविद्यालये व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन सेवा सुरू करणे, विद्यार्थ्यांसाठी चोवीस तास मानसिक आरोग्य सहाय्यता दूरध्वनी सेवा उपलब्ध करणे, विद्यार्थी आत्महत्या प्रतिबंधासाठी स्वतंत्र राज्यस्तरीय धोरण जाहीर करणे, तसेच परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता व विश्वासार्हता वाढविण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची मागणी केली आहे.यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जनजागृती मोहीम राबविणे, पालक व शिक्षकांसाठी समुपदेशन कार्यशाळा आयोजित करणे, परीक्षा अपयशानंतर विद्यार्थ्यांना पर्यायी शिक्षण व रोजगार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या संरक्षणासाठी दीर्घकालीन कृती आराखडा तयार करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.तसेच, या निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली, कोणत्या विभागाकडे प्रकरण पाठविण्यात आले आणि शासनाने कोणती पुढील पावले उचलली याची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ११ प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्ती आदेशांचे वितरण

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्यामुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत सुशिक्षित युवक-युवतींना उद्योग व सेवा क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, त्यांचे कौशल्य विकसित व्हावे आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी अधिक सक्षम व्हाव्यात, या उद्देशाने सदर योजना राबविण्यातयेतअसूनयामध्ये १८ ते ३५ वयोगटातील किमान १२ वी पास उमेदवारांना ११ महिन्याचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते.यामध्ये त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार १२ वी करीता ६,००० रुपये आय.टी.आय./ डिप्लोमाकरीता ८,००० रुपये वपदवीवपदविधरकरीता १०,००० रुपये इतके विद्यावेतन डी.बी.टी.व्दारे थेट उमेदवारांच्या खात्यात अदा केले जाते.

सदर योजनेच्या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जालना यांनी ११ उमेदवारांची निवड करण्यात आली असून निवड झालेल्या ११ प्रशिक्षणार्थ्यांना सतीश टोपे, अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,जालनावश्री. गणेश चिमणकर, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालनायांच्याहस्ते प्रशिक्षणाकरिता नियुक्ती आदेशांचे वितरणदि. १ जुलै २०२६ रोजी करण्यात आले. यावेळी अध्यक्ष, सतीश टोपे, जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी उमेदवारांचे अभिनंदन करून प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त, प्रामाणिकपणा आणि समर्पणाने काम करण्याचे आवाहन केले. बँकिंग क्षेत्रातील हे प्रशिक्षण त्यांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच गणेश चिमणकर, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ही युवकांच्या कौशल्य विकासाला चालना देणारी आणि उद्योग क्षेत्राशी प्रभावी दुवा निर्माण करणारी महत्त्वपूर्ण योजना असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींनी या योजनेत नोंदणी करून शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास अशितोष देशमुख, कार्यकारी संचालक, जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सुरेश जाधव, सरव्यवस्थापक, अमोल बोरकर, कनिष्ठ कौशल्य विकास अधिकारी, डॉ. अमोल परिहार, समुपदेशक, मॉडेल करिअर सेंटर, रविंद्र पाडमुख, जिल्हा समन्वयक, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना तसेच जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावे; अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे - मंत्री गिरीश महाजन

## आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांची राज्य आपत्तकालीन नियंत्रण कक्षाला भेट

**मुंबई- प्रतिनिधी**

राज्यात दमदार पावसाला सुरुवात झाली असून गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत पाऊस सुरू आहे. विशेषतः मुंबईत चांगला पाऊस होत असून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून अनेक ठिकाणी नद्या, नाले भरून वाहत आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि सर्व जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणा पूर्णपणे सतर्क ठेवण्यात आल्या आहेत. आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आले आहेत, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा ( विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मंत्री महाजन यांनी मंत्रालयातील राज्य आपत्तकालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन पाहणी केली आणि अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शासकीय यंत्रणेस सतर्कतेच्या सूचना दिल्या. याप्रसंगी विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल, संचालक डॉ भालचंद्र चव्हाण उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, भारतीय हवामान विभागाने ३ आणि ५ जुलै रोजी राज्यातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ते म्हणाले, राज्य शासन आणि प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र प्रत्येक नागरिकानेही स्वतः ची आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. मुंबईतील काही भागांत पावसामुळे पाणी साचण्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना केल्यामुळे सध्या परिस्थिती नियंत्रणात असून बहुतांश ठिकाणी जनजीवन सुरळीत झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री महाजन यांनी सांगितले की, मुंबई महापालिका तसेच संबंधित सर्व यंत्रणांच्या सातत्याने संपर्कात राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी महानगरपालिका प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्व नागरिकांनी सतर्क राहावे, सुरक्षित राहावे आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

नागरिकांना आपत्तकालीन परिस्थितीत संपर्कसाठी राज्य आपत्तकालीन नियंत्रण कक्षाचे २४७ हेल्पलाइन क्रमांक : १०७०, ०९३२१५८७१४३, ०२२-२२०२७९९०, ०२२-२२७९४२२९ असून जिल्हास्तरीय संपर्क क्रमांक: १०७७ आहे. या भेटीदरम्यान, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल यांनी सद्यस्थिती, तयारीची सद्यस्थिती आणि विभागामार्फत हाती घेण्यात आलेल्या प्रमुख उपाययोजनांची माहिती दिली.

# अहिल्यानगर येथे ज्येष्ठ पत्रकार फेडरेशनची सभा

**जालना - प्रतिनिधी**

देशभरात जेष्ठ पत्रकारांच्या पेन्शन व आरोग्य योजना बाबत अनेक समस्या असल्यामुळे केरळ राज्यात प्रथम या वरील विषयाला केंद्र सरकारकडून मागण्यांसाठी भारतातले ज्येष्ठ पत्रकार यांनी अनेक संघटनात कार्यरत राहून पत्रकारांचे प्रश्न सोडविले अशांनी एकत्र येऊन भारतातील ज्येष्ठ पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार फेडरेशनची स्थापना झाली त्याची महाराष्ट्र शाखेची स्थापना करण्यात येत आहे.अहिल्यानगर येथील सावेडी रोडवरील माऊली संकुल सभागृहात रविवार दिनांक ५ जुलै रोजी दुपारी तीन ते पाच या वेळेत होणार असून यासाठी फेडरेशनचे राष्ट्रीय सचिव प्राध्यापक डॉ. जयपाल पाटील हे उपस्थित राहणार आहेत.संपुर्ण देशातील ज्येष्ठ पत्रकाराच्या विविध प्रश्न सोडवण्यासाठी केरळ त्रिवेनपुरम येथे स्थापन झालेल्या जेष्ठ पत्रकार महासंघ भारतातर्फे दिनांक १४ व१५ मार्च रोजी वायसो होटेल बॅगिनी जुना गोवा येथे आयोजित करण्यात आले होते.



या दोन दिवस संमेलनात जेष्ठ पत्रकाराच्या सामाजिक सुरक्षा परिस्थितीवर चर्चासत्र, व्यवसाय सत्र,गोवा मंत्रालय मंत्री व पत्रकार विभाग सचिवांचे मार्गदर्शन झाले . गोवा जेष्ठ पत्रकार संघटनेच्या सहयोगाने होत असून यांची जबाबदारी *(पान २ वर)*

# अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार

## *१०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर*

**मुंबई - प्रतिनिधी**

गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.

सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली.

नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली.

या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे - गटशिक्षणाधिकारी क्षीरसागर

**मंठा -प्रतिनिधी**

गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची संपूर्ण तयारी तालुका शिक्षण विभागाने केलेली असून शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे. चौथी आणि सातवी शिष्यवृत्ती, एनएमएमएस, नवोदय आदी स्पर्धा परीक्षेची तयारी घेऊन विद्यार्थ्यांना गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी द्यावी असे मार्गदर्शन गटशिक्षणाधिकारी श्री डी.एन. क्षीरसागर यांनी केले.

गुरुवार, २ जुलै,२०२६ रोजी सकाळी परिपाठावेळी अचानक भेट देऊन गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची पाहणी केली. याप्रसंगी



विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि मार्गदर्शन केले. समवेत शिक्षण विस्ताराधिकारी श्री के.जी.भाऊ राठोड, केंद्रप्रमुख श्री शिवाजीराव देशमुख आणि पंचायत समितीचे श्री आंबटकर उपस्थित होते.

वर्गशिक्षक श्री वानोळे यांच्या इयत्ता तिसरीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांनी गौरव केला.

याप्रसंगी प्रशालेच्यावतीने मुख्याध्यापक नंदकिशोर पारस्कर आणि प्राथमिक शाळेचे गंगाधर वानोळे यांनी गटशिक्षणाधिकारी श्री क्षीरसागर यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन नामदेव चव्हाळ यांनी केले. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# मुंबई स्टॉक एक्सचेंजसमोर स्वर्गीय बाबूजींचा पुतळा हा त्यांच्या कार्याचा गौरव - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## *स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण*

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई स्टॉक एक्सचेंज देशभरासाठी आकर्षणाचे ठिकाण आहे. अशा ठिकाणी स्वर्गीय बाबूजींचा पुतळा असणे, हा त्यांच्या कार्याचा गौरव असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई स्टॉक एक्सचेंज समोर स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माजी खासदार विजय दर्डा, माजी मंत्री राजेंद्र दर्डा आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय जवाहरलाल दर्डा उपाख्य बाबूजी यांचे देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील कार्य खूप मोठे आहे. त्यांनी त्या काळात युवकांचे संघटन करीत आंदोलने करून स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवली. महाराष्ट्रात मंत्री असताना विविध खात्यांची जबाबदारी स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांनी यशस्वीपणे सांभाळली असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले की, बाबूजींनी आपल्या सामाजिक राजकीय जीवनामध्ये दीर्घकाळ महाराष्ट्राचे मंत्री म्हणून केलेल्या कार्याची छाप संबंधित विभागामध्ये आजही जाणवते. यवतमाळमध्ये शालेय जीवनापासूनच त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत पुढाकार घेतला. त्या काळात असलेल्या स्वातंत्र्य सेनानींच्या विचारांचा स्पर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला झाला. स्वातंत्र्याच्या चळवळीत योगदान देताना त्यांना कारावासही भोगाव लागला. स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांनी मराठी पत्रकारितेमध्ये लोकमतची मुहूर्तमेढ रोवली. सद्यस्थितीत लोकमत वृत्तपत्र राज्यातच नव्हे, तर देशातील मराठी भाषेतील अग्रगण्य वृत्तपत्र आहे. सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांमध्ये लोकमत आपल्याला दिसतो, त्याचे खरे श्रेय स्व बाबूजींना जाते, अशा शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वर्गीय जवाहरलाल दर्डा यांच्या पत्रकारितेतील कार्याचा गौरवही केला.

# लायन्स क्लबतर्फे डॉक्टर्स, सीए व युवा शेतकरी नेतृत्वाचा सन्मान

**जालना - प्रतिनिधी**

डॉक्टर्स डे, सीए डे आणि फार्मर्स डे निमित्त जालना लायन्स क्लबच्यावतीने राष्ट्र उभारणीत अत्यंत महत्त्वाचे योगदान देणारे डॉक्टर्स, सीए आणि देशाचा कणा असलेले युवा शेतकरी नेतृत्व या मुख्य स्तंभांचा विशेष सन्मान करण्यात आला. १ जुलै रोजी हॉटेल मधुबनच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लॉयन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. गिरीश पाकणीकर हे होते. व्यासपीठावर सचिव गणेश कामड, कोषाध्यक्ष महावीर गेलडा, प्रकल्पप्रमुख जयप्रकाश श्रीमाली, भारती लोहिया आणि राजेश खिस्ते यांची उपस्थिती होती.



याप्रसंगी सीए आकाश मुंदडा, सीए श्रीनिवास तोतला, सीए अभिषेक भुतडा, सीए रिचा शर्मा, सीए अमोल अग्रवाल, सीए साक्षी अग्रवाल, सीए केतकी शिंदे, डॉ. राधिका भुतडा, डॉ. सागर भुतडा, डॉ. गिरीजा सचदेव, डॉ. साक्षी खंडेलवाल, डॉ. अंकिता अग्रवाल, डॉ. रुचा रवींद्र हुसे, डॉ.शिरीष भरतीया, डॉ. रितिका भरतीया, डॉ.सौरभ गव्हाणे, डॉ. आसावरी गव्हाणे, डॉ.अक्षय पाकणीकर,डॉ. अंजली देशमुख, डॉ. धीरज कचरे, डॉ. नेहा भुतडा यांचा तर फार्मर डेनिमित्त दिनानिमित्त युवा शेतकरी नेतृत्व अक्षत झुनझुनवाला, समीर अग्रवाल, प्रतीक लड्डा, जयंत उजवणे, अंकित दाड,अजिंक्य घुगे, साहिल सरोदे यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गिरीश पाकणीकर म्हणाले की, डॉक्टर, सीए आणि शेतकरी समाजाचे तीन आधारस्तंभ असून, डॉक्टर्स आरोग्याची, सीए हे आर्थिक नियोजनाची तर शेतकरी हे अन्नधान्य पिकविण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्यांचा सन्मान करणे हे आद्यकर्तव्य आहे. हे तिन्ही घटक देश आणि समाजाप्रती निष्ठेचे प्रतीक असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. माझी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर राहील, असे ते म्हणाले. सचिव गणेश कामड म्हणाले की, कार्यकारिणी सदस्यांच्या संकल्पनेतून वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सूत्रसंचालन जयप्रकाश श्रीमाली यांनी केले तर आभार महावीर गेलडा यांनी मानले.

### जालन्यात 'मोगरा फुलला' संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त जीवनचरित्रावर आधारित आगळावेगळा सांगीतिक सोहळा

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्माच्या ७५० व्या वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांच्या मालिकेत जालना येथे 'मोगरा फुलला' हा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.हा कार्यक्रम दि. ३ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे शैक्षणिक संकुलाच्या सभागृहात संपन्न होणार आहे.सुप्रसिद्ध निरूपणकार गणेश शिंदे हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनातील प्रेरणादायी,समाजप्रबोधन करणारे प्रसंग निरूपणातून श्रोत्यांसमोर उलगडणार आहेत.



# सीए श्रीनिवास तोतला यांचा गौरव

**जालना - प्रतिनिधी**

सीए दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ जालना तर्फे शहरातील नामांकित चार्टर्ड अकाउंटंट श्रीनिवास नितीन तोतला यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. गिरीश पाकणीकर होते.

या प्रसंगी व्यासपीठावर सचिव गणेश कामड, कोषाध्यक्ष महावीर गेलडा, राजेश खिस्ते, जयप्रकाश श्रीमाली, सौ. भारती लोहिया आणि सीए डॉ. नितीन तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यात लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सीए श्रीनिवास तोतला यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात



आला. सत्काराला उत्तर देताना सीए श्रीनिवास तोतला म्हणाले की, सीए ही पदवी केवळ एक व्यवसाय नसून ती देशाच्या आर्थिक प्रगतीची आणि पारदर्शकतेची मोठी जबाबदारी आहे. आज मिळालेला हा सन्मान मला भविष्यात अधिक प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि सामाजिक भान ठेवून काम करण्याची ऊर्जा देईल. माझ्या या यशात माझे कुटुंबीय, विशेषतः सीए डॉ. नितीन तोतला आई ॲड. सौ. अर्चना तोतला आणि बहिन सीए साक्षी तोतला माझ्या मार्गदर्शकांचा मोठा वाटा आहे. जालना शहराच्या आणि येथील उद्योजक- व्यापाऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत माझे योगदान देण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन, असे ते म्हणाले.

# युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाची बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना सदिच्छा भेट

## विविध सामाजिक विषयांवर सकारात्मक चर्चा

**दत्ता देशमुख**

युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया यांच्या वतीने आज बुलढाणा जिल्हाधिकारी. यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, प्राणी संरक्षण व बचावकार्य, युवकांचा सामाजिक सहभाग, जनजागृती उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन तसेच शासन व सामाजिक संस्थांच्या समन्वयातून लोकहिताचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत विचारांची देवाणघेवाण झाली. युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियामार्फत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात लोकसहभाग वाढवून पर्यावरण संरक्षण, प्राणी कल्याण *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.